# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०६/२०१३** **दिनांक ०७.०३.२०१३**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी ०४.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दि.०७.०३.२०१३ रोजी दुपारी ०४.०० वाजता शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-५५२०-२०१३, दिनांक ०५ मार्च, २०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दि.०७.०३.२०१३ रोजी दुपारी ०४.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष, श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, सदस्य
०३. किशोर मोरे,कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत अहमदनगर जिल्हयातील दुष्काळग्रस्त गावे/ वाडया-वस्त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या प्लास्टीक टाक्या खरेंदी करणेकामी आलेल्या निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०७.०२.२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती (त्रीसदस्य) सभेत चर्चा होऊन अहमदनगर जिल्ह्यासाठी प्लॅस्टिक टाक्या खरेदीकामी रु.५,६३,७५,०००/- मात्रचे खर्चाची तरतुद करण्यात आलेली आहे. त्याबाबत तत्वत: प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे (त्रीसदस्य) सभेत निर्णय झालेला आहे.

त्यानुसार १००० नग प्लॅस्टिक पाण्याच्या टाक्या खरेदीबाबत दि.१२-१३.०२.२०१३ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. निविदा विक्री दि.१३.०२.२०१३ ते दि.१९.०२.२०१३ अशी ठेवण्यात आलेली होती. मुदतीअंती शिर्डी व मुंबई कार्यालयातुन एकुण २१ निविदांची विक्री करण्यात आलेली आहे. जाहिरातीमध्ये निविदेतील शर्ती अटी वगैरेबाबत चर्चा करणेसाठी शिर्डी येथे दि.२३.०२.२०१३ रोजी प्रि-बीड मिटींग व निविदा स्विकारण्याची अंतिम दि.२७.०२.२०१३ अशी ठेवण्यात आलेली होती.

त्यानुसार ज्या कंपनीने/वितरकांनी निविदा खरेदी केलेल्या आहेत.अशा सर्व निविदाधाकांना दि.२३.०२.२०१३ रोजी सकाळी १२.०० वा. शिर्डी येथे साईनिवास अतिथिगृहात उपस्थित राहणेबाबत दूरध्वनीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार उपस्थित झालेल्या निविदाधारकांशी त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत चर्चा करण्यात आली.

चर्चेमध्ये निविदाधारकांनी निविदेतील अटी शर्तीबाबत अभ्यास करण्यासाठी कालावधी कमी असल्याने निविदा सादर करणेची मुदत वाढवून द्यावी अशी विनंती केली त्यामुळे निविदा सादर करणेची अंतिम तारीख २७.०२.२०१३ ऐवजी ०४.०३.२०१३ अशी ठेवण्यात आली.

मुदतीअंती शिर्डी व मुंबई कार्यालय येथे प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| १. | मे.इन्फ्रा इंडस्ट्रिज लि., मुंबई | १८५४६/०४.०३.२०१३ |
| २. | मे.फेनिक्स पॉली कंटेनर्स, सातारा | १८५४७/०४.०३.२०१३ |
| ३. | मे.भिंगारवाला एंटरप्रायझेस, अहमदनगर | १८५४८/०४.०३.२०१३ |
| ४. | मे.श्री साईनारायण प्लॅस्टिक्स प्रा.लि., पांगरा, पोस्ट-चितेगाव, ता.- पैठण | १८५४९/०४.०३.२०१३ |
| ५. | मे.रोटोमॅटीक कंटेनर्स प्रा.लि., नाशिक | १८५५०/०४.०३.२०१३ |
| ६. | मे.मनिनाथ प्लॅस्टिक्स प्रा.लि., मुंबई | २१०/०२.०३.२०१३ मुं.कार्या. |

उपरोक्त निविदा दोन लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्रमांक १ चे लिफाप्यात बयाणा रक्कमेचा डी.डी. अथवा रोखीची भरणा पावती, इतर कागदपत्रे व क्रमांक २ च्या लिफाप्यात मुळ निविदांची मागणी केलेली आहे.

त्यानुसार दि.०४.०३.२०१३ अखेर वरील निविदाधारकांच्या सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांनी सादर केलेल्या निविदेसोबतचा लिफाफा क्र.१ दि.०६.०३.२०१३ रोजी मा.कार्यकारी

अधिकारी सो. यांचे समक्ष उघडण्यात येऊन निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच निविदेमध्ये मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यांत आली. त्यामध्ये वरील अ.नं.१ मे.इन्फ्रा इंडस्ट्रिज लि., मुंबई यांनी बयाना रकमेचा डी.डी. तसेच मागणी केलेली कागदपत्रे जोडली नसल्याने त्यांच्या निविदेचा विचार करता येणार नाही.

उपरोक्त प्रस्तावातील अ.२ ते ६ निविदाधारकांच्या मूळ निविदा (लिफाफा क्र.२) आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदाधारकांना सभेसमोर चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | २००० लिटर | ३००० लिटर | ४००० लिटर | ५००० लिटर |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे.फेनिक्स पॉली कंटेनर्स, सातारा (जलराज ब्रॅण्ड) | | | | |
| | **निविदेतील दर प्र.लि. रु.** | ०७.०० | ६.७५ | ६.७५ | ६.७५ |
| | **चर्चेअंती देऊ केलेला दर प्र.लि. रु.** | **०७.००** | **६.७५** | **६.७५** | **६.७५** |
| २. | मे.भिंगारवाला एंटरप्रायझेस, अहमदनगर (सिंटेक्स ब्रॅण्ड) | | | | |
| | **निविदेतील दर प्र.लि. रु.** | ०८.५० | ८.५० | --- | ८.५० |
| | **चर्चेअंती देऊ केलेला दर प्र.लि. रु.** | ०८.३५ | ०८.३५ | --- | ०८.३५ |
| ३. | मे.श्री साईनारायण प्लॅस्टिक्स प्रा.लि., पांगरा, ता.- पैठण (सरीता ब्रॅण्ड) | | | | |
| | **निविदेतील दर प्र.लि. रु.** | ०७.०० | --- | --- | ७.२० |
| | **चर्चेअंती देऊ केलेला दर प्र.लि. रु.** | **०७.००** | --- | --- | ७.२० |
| ४. | मे.रोटोमॅटीक कंटेनर्स प्रा.लि., नाशिक (स्टोरवेल ब्रॅण्ड) | | | | |
| | **निविदेतील दर प्र.लि. रु.** | ०८.०० | ८.०० | ८.०० | ८.०० |
| | **चर्चेअंती देऊ केलेला दर प्र.लि. रु.** | **०७.००** | ८.०० | ८.०० | ८.०० |
| ५. | मे.मनिनाथ प्लॅस्टिक्स प्रा.लि., मुंबई (सिंकरो ब्रॅण्ड) | | | | |
| | **निविदेतील दर प्र.लि. रु.** | ०७.७४ | ७.६५ | ७.४७ | ७.३० |
| | **चर्चेअंती देऊ केलेला दर प्र.लि. रु.** | **०७.००** | ७.६५ | ७.४७ | ७.३० |

**निर्णय क्र.२५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**(१) २००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या खरेदीकामी मे.फेनिक्स पॉली कंटेनर्स, सातारा (जलराज ब्रॅण्ड), मे.श्री साईनारायण प्लॅस्टिक्स प्रा.लि., पांगरा, ता.- पैठण (सरीता ब्रॅण्ड), मे.रोटोमॅटीक कंटेनर्स प्रा.लि., नाशिक (स्टोरवेल ब्रॅण्ड), मे.मनिनाथ प्लॅस्टिक्स प्रा.लि., मुंबई (सिंकरो ब्रॅण्ड) यांचे प्रती लिटर रु.७/- मात्र याप्रमाणे २००० लिटर क्षमतेच्या प्रती नगासाठी रु.१४,०००/- मात्र हे समान निम्नतम दर आलेले आहेत, ते स्विकारणेत यावे.**

**(२) मे.फेनिक्स पॉली कंटेनर्स, सातारा (जलराज ब्रॅण्ड) यांचे ३०००, ४००० व ५००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्यांसाठी प्रती लिटर रु.६.७५ मात्र प्रमाणे अनुक्रमे रु.२०,२५०/, रु.२७,०००/- व ३३,७५०/- मात्र असे निम्नतम दर आलेले आहेत, ते स्विकारणेत यावेत.**

**(३) दि.०७.०२.२०१३ रोजीचे सभेतील निर्णयाद्वारे ५००० लिटर क्षमतेच्या १०२५ नग पाण्याच्या टाक्या खरेदी करणेबाबत निर्णय झालेला आहे. परंतु ५००० लिटर क्षमतेच्या टाक्यांमध्ये टँकरने आणलेले पाणी टाकणेस अडचणीचे ठरणार आहे. तसेच, एकाच गावात ५००० लिटरची पाण्याची टाकी ठेवल्याने एकाच ठिकाणी पाण्यासाठी गर्दी होऊन, तेथे वाद होण्याची शक्यता असल्याने गावातील विविध भागात कमी क्षमतेच्या टाक्या विभागुन ठेवल्याने सर्वांना पाण्याची सुविधा उपलब्ध होऊ शकेल, याकरीता ५००० लिटर क्षमतेऐवजी २००० लिटर क्षमतेच्या २५०० नग पाण्याच्या टाक्या ISI मार्क, डबल लेअर सध्या खरेदी करणेत याव्यात. त्याव्यतिरिक्त आवश्यकता भासल्यास उपरोक्त निम्नतम दराने जादा टाक्या खरेदी करणेस मान्यता देण्यात आली. पाण्याच्या टाक्या कोणत्या गावात, कोणत्या ठिकाणी पोहोच करावयाच्या याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेशी पुरवठाधारकांनी संपर्कात राहुन नियोजन करावे, असे ठरले.**

**(४) अ.नं.१ मधील २००० लिटर पाण्याच्या टाक्याचे निम्नतम दरधारकांना २५०० नग पाण्याच्या टाक्या सम प्रमाणात विभागुन त्वरीत पुरविणेचे तसेच, आवश्यकतेनुसार**

**जादा लागणाऱ्या २००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या त्याच दराने पुरविण्याचे, निविदेतील अटी व शर्तीस अधीन राहुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**(५) ३०००, ४००० व ५००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्यांची आवश्यकता भासल्यास, त्यानुसारच अ.नं.२ मधील निम्नतम दरधारक मे.फेनिक्स पॉली कंटेनर्स, सातारा (जलराज ब्रॅण्ड) यांना निविदेतील अटी व शर्तीस अधीन राहुन पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**(६) मान्सुन कालावधीत कमीचे पर्जन्यमानामुळे भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याने अहमदनगर जिल्हयातील गावे तसेच वाडया-वस्त्यांवर पाणी साठविणेकरीता संस्थानमार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्या आवश्यकतेनुसार पुरविणेस व त्याकामी येणाऱ्या रु.३,५०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(७) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०२.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.१२० (०१) अन्वये अहमदनगर जिल्हयातील दुष्काळग्रस्त गावे/ वाडया-वस्त्यांना दि.०१ मार्च २०१३ ते दि.३० जुन २०१३ अखेर पर्यंत संस्थानमार्फत टॅंकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविणेकरीता मान्यता मिळालेली आहे. आता, मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेमार्फत पिण्याचे पाण्याची टंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाय योजनांचा कृती आराखडा तयार झालेला असून, त्यामध्ये अहमदनगर जिल्हयातील दुष्काळग्रस्त गावे/ वाडया-वस्त्यांना दि.०१ मार्च २०१३ ते दि.३० जुन २०१३ अखेर पर्यंत टॅंकर/ बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा करणेकामी अंदाजे रु.२५ कोटी मात्रचा खर्च अपेक्षित आहे. याकामीची रु.२५ कोटी मात्र अनुदानाची रक्कम संस्थानने जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे टंचाई शाखेकडे वर्ग करावेत व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या टंचाई शाखेमार्फत सदरहू अनुदानाच्या रकमेचे वितरण करण्यात यावे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेकडून संस्थानने त्याचे उपयोगीता प्रमाणपत्र घ्यावे, असे ठरले.**

**(८) २००० लिटर क्षमतेच्या २५०० नग पिण्याच्या पाण्याच्या टाक्या पुरविणेकामी येणारा रु.३,५०,००,०००/- मात्र व अहमदनगर जिल्हयातील दुष्काळग्रस्त गावे/ वाडया-वस्त्यांना दि.०१ मार्च २०१३ ते दि.३० जुन २०१३ अखेर पर्यंत टॅंकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविणेकरीता येणाऱ्या अंदाजे रु.२५ कोटी मात्रचे खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची पुर्व मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(अधिक्षक, खरेदी विभाग/ पाणी पुरवठा विभागप्रमुख/ मुख्य लेखाधिकारी/ प्र. शाखा-वशी-०३/ विधी अधिकारी)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ सन २०१३ करीता तिनही उत्सवाचे निमंत्रण पत्रिका छपाईकामी आलेली दरपत्रके मा.त्रिसदस्यीय समितीचे समक्ष उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री क्षेत्र शिरडी येथे श्री रामनवमी उत्सव-२०१३ हा दिनांक -१८/०४/२०१३ ते दिनांक २०/०४/२०१३ अखेर तीन दिवस साजरा होणार आहे.

सन २०१३ मध्ये होणारे तिनही उत्सवा करीता निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाईकामी तसेच पत्रिका पाकीटात भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आलेली असुन त्यामध्ये निविदा विक्री दिनांक-२३/०२/२०१३ दिनांक ०१/०३/२०१३ अशी मुदत देण्यात आलेली होती आणि निविदा भरुन स्विकारण्याची मुदत ०३/०३/२०१३ अखेर देण्यात आलेली होती. याकामी खालील तपशीलाप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व पत्ता | आवक नंबर | आवक दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री सोमेश्वर प्रिंटर्स नाशिक | १८१२५ | २३/२/२०१३ | बंद पाकिट |
| २ | प्रवरा ऑफसेट,विठ्ठल प्रभा हौसिग सोसायटी, प्रवरा बॅंकेच्या मागे दाढ रोड, लोणी | १८४०५ | २८/०२/२०१३ | बंद पाकिट |
| ३ | निट प्रिंटस, अहमदनगर | १८५४५ | २/०३/२०१३ | बंद पाकिट |
| ४ | न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, वडाळा मुंबई | १८५६३ | ४/०३/२०१३ मुंबई कार्यालय | बंद पाकिट |

पैकी अ.नं. १ ते ३ ची दरपत्रके मुदतीत व अ.नं.४ मुंबई कार्यालय येथून प्राप्त झालेली आहेत.

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात येऊन दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | प्रेसधारकांचे नांव व गांव | भक्त मंडळ सभासद निमंत्रण पत्रिका - दोन्ही बाजूने फोर कलर वुईथ टु फोल्डींग, पाकिटासह छपाई व छपाई केलेल्या पत्रिका पाकिटात भरणेसहीत कोटेशन पत्रात नमुद केले प्रमाणे | |
|---|---|---|---|
| | | मुळदर प्रती नग | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर |
| १ | श्री सोमेश्वर प्रिटर्स, नाशिक | १.६८+ व्हॅट | १.४४ + व्हॅट |
| २ | प्रवरा ऑफसेट, लोणी | १.६०+ व्हॅट | १.४५+ व्हॅट |
| ३ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | १.५४+ व्हॅट | **१.४३+ व्हॅट** |
| ४ | न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, वडाळा मुंबई | १.७९+ व्हॅट<br>१.०७+ व्हॅट | २.८६+ व्हॅट |

निर्णय क्र.२५९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१३ मधील तिनही उत्सवाच्या, भक्त मंडळ सभासद व मान्यवरांना पाठविणेसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या वर्णनाप्रमाणे निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाई करुन पत्रिका पाकिटात भरणेकामी, मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर यांचे प्रती नग रु.१.४३ + व्हॅट मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत यावे व त्यांचेकडून आवश्यकतेप्रमाणे निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाई करुन घेण्यात याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **वाहन विभागातील सर्व वाहनांचे वार्षिक विमा नुतनीकरणांचे कोटेशन्स उघडणेबाबत.**
**प्रस्ताव-** वाहन विभागात कार, रुग्णवाहिका, बसेस व मालवाहतूक अशी एकुण ६८ वाहने वापरात आहेत. सदर वाहनांचा विमा दि.३१/०३/२०१३ अखेर संपुष्टात येत आहे.

या पुढे दि.०१/०४/२०१३ ते दि.३१/०३/२०१४ अखेर एक वर्षाकरीता सर्व वाहनांचा विमा नुतनीकरण करावयाचा असलेने मा. का. अ. कार्यालय आवक नं.४४४, दि.०५/०२/२०१३ चे मान्यते नुसार, जा.नं. एसएसएस/वाहन/५०८४/२०१३, दि.०६/०२/२०१३ ने राष्ट्रीयकृत कंपन्या दि. ओरिएण्टल इंश्योरेंस कं. लि., नेशनल इन्श्योरेन्स कं. लि., युनायटेड इंडिया इन्श्यूरेन्स कं. लि., दि. न्यु इंडिया अॅश्यूरन्स, कं. लि. यांचेकडून कोटेशन्स बोलाविण्यात आलेली होती. त्यानुसार खालील प्रमाणे बंद कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

| **अ.नं.** | **कोटेशनधारकांचे नांव** | **आवक नं. / दिनांक** | |
|---|---|---|---|
| ०१. | दि. ओरिएण्टल इंश्योरेंस कं. लि. | १८१०३-२३/०२/२०१३ | - बंद कोटेशन |
| ०२. | नेशनल इन्श्योरेन्स कं. लि. | १८१०४-२३/०२/२०१३ | - बंद कोटेशन |
| ०३. | युनायटेड इंडिया इन्श्यूरेन्स कं. लि. | १८१०५-२३/०२/२०१३ | - बंद कोटेशन |
| ०४. | दि. न्यु इंडिया अॅश्यूरन्स, कं. लि. | १८१०६-२३/०२/२०१३ | - बंद कोटेशन |

तरी वरील प्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा व वाटाघाटी करुन निर्णय घेणेस तसेच या कामी येणाऱ्या अंदाजे रु.१२,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. बारा लाख मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेले ०४ सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनधारक कंपनीचे नाव | एकुण IDV रक्कम रु. | एकुण प्रिमीअम रक्कम रु. | वाटाघाटी नंतर देऊ केलेल दर |
|---|---|---|---|---|
| १ | दि. ओरिएण्टल इंश्योरेंस कं.लि. | दिलेली नाही | ११,७५,०००/- | ११,७५,०००/- |
| २ | नेशनल इन्श्योरेन्स कं.लि. | दिलेली नाही. | १२,५०,०००/- | अनुपस्थित |
| ३ | युनायटेड इंडिया इन्श्योरेन्स कं.लि. | दिलेली नाही. | १२,२५,०००/- | १२,२५,०००/- |
| ४ | दि.न्यु इंडिया अॅश्युरन्स, कं.लि. | २,११,४३,०४२/- | १०,९५,१७०/- | **१०,९५,१७०/-** |

निर्णय क्र.२६० **चर्चा/ वाटाघाटीचे वेळी उपस्थीत असलेल्या कंपनींचे प्रतिनिधींनी वाटाघाटीअंती देऊ केलेले दर हे दि.३१.०३.२०१३ पर्यंत लागू राहतील व दि.०१.०४.२०१३ पासून इन्शुरन्स रेग्युलॅटरी अॅण्ड डेव्हलपमेंट अॅथोरीटी यांचेकडून थर्ड पार्टी इन्शुरन्स प्रिमियम मध्ये वाढ झाल्यास होणारी वाढीव प्रिमियम रक्कम याव्यतिरिक्त आदा करावी लागेल, असे सांगितले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागातील संस्थानचे वापरात असलेल्या ६८ वाहनांचा सन २०१३-१४ या एक वर्षाचे कालावधीसाठी वार्षिक विम्याचे नुतनीकरण करणेकामी दि.न्यु इंडिया अॅश्युरन्स, कं.लि. यांचे रु.१०,९५,१७०/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत आले. तसेच चर्चेत ठरलेप्रमाणे दि.०१.०४.२०१३ पासून थर्ड पार्टी इन्शुरन्स प्रिमियम मध्ये वाढ झाल्यास वाढीव**

**रक्कम दि.न्यु इंडिया ॲश्युरन्स, कं.लि. यांना आदा करणेत यावी. याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वाहन विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **पाणी टंचाईमुळे प्रसाद भोजनासाठी एल.डी.फोम पत्रावळ खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१२-१३ (माहे नोव्हे-१२ ते मार्च-१३अखेर) करीता किराणा माल खरेदी प्रक्रीयेमध्ये दिनांक दि.१२.११.२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती (त्रीसदस्य) सभेतील निर्णयानुसार ४,००,००० नग चार कप्प्याची एल.डी.फोम पत्रावळ खरेदीस मान्यता मिळाली आहे. मे. देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर यांना एसएसएस-वशी /खरेदी-प्रसाद/३७३६/२०१३ दि.१९.११.२०१३ अन्वये ४,००,००० नग पत्रावळ खरेदीसाठी प्रति हजारी १,३५०/- रुपये मात्र याप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आला आहे. त्यापैकी सर्व पत्रावळीचा पुरवठा होणे बाकी आहे.

प्रसादालय विभागाकडील दि.०३.०३.२०१३ रोजीचे मंजूर टिपणी नुसार तीव्र पाणी टंचाई निर्माण झालेमुळे थर्माकॉल पत्रावळ खरेदी करुन मिळणेबाबतचा प्रस्ताव खरेदी विभागाकडे दि.०५.०३.२०१३ रोजी १५.०० वाजता प्राप्त झालेला आहे. उपरोक्त प्रस्तावात प्रसादालयात दररोज सरासरी ४०,००० साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. त्यामुळे पाणी टंचाई संपेपर्यंत (माहे मार्च २०१३ ते मे २०१३ अखेर) प्रसादालयात प्रसादभोजनासाठी दररोज थर्माकॉल पत्रावळीचा वापर करणे गरजेचे आहे.प्रसादालय विभागात तीन महीन्यांसाठी अंदाजे ३६ लाख नग पत्रावळी खरेदी करावी लागणार आहे. प्रसादालय विभागामध्ये होणारी साईभक्तांची गर्दीमध्ये (सुटीचा कालावधी व रामनवमी उत्सव) साईभक्तांना प्रसाद भोजन देणेकामी पत्रावळीचा वापर करणे गरजेचे आहे.तरी उद्‌भवलेल्या पाणी टंचाईमुळे मे. देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर यांना दुरध्वनीवरुन मंजुर दरामध्ये पत्रावळ पुरवठा करणे बाबत विचारणा केली असता त्यांनी मागील मंजुर दरामध्ये पत्रावळीचा पुरवठा करणेची तयारी दर्शविलेली आहे.

तरी प्रसादभोजनासाठी LD FOAM पत्रावळ वापरणेसाठी संबंधित पुरवठाधारक मे. देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर यांचे प्रति हजारी रुपये १,३५०/- मात्र या मंजुर दराने ३६,००,००० नग (छत्तीस लाख) पत्रावळ खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या एकुण रुपये ४८,६०,००० (अक्षरी रुपये अठेचाळीस लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या असलेली पाणी टंचाई विचारात घेता, तातडीची गरज म्हणून श्री साई प्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसाद भोजन देणेकामी एक महिन्याच्या कालावधीकरीता (श्री रामनवमी उत्सव- २०१३ सहित) पुरेल एवढया १५,००,००० नग LD FOAM पत्रावळ मे. देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर यांचेकडून प्रति हजारी रुपये १,३५०/- मात्र या मंजुर दराने आवश्यकतेनुसार खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या एकुण रुक्कम रु.२०,२५,००० मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

वरील निर्णय क्र. २५८ ते २६१ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी